**MHST080003532022**

**रे. दि. मु. क्रमांक ८२/२०२२ मधील नि.क्र. ३८ खालील आदेश.**

**शौकतभाई अशोक जाधव व इ. विरुध्द संतोष अशोक जाधव**

**आदेश पारित दिनांक ०२.०४.२०२४**

---

वादी तर्फे प्रस्तूतचा अर्ज सिव्हील प्रोसिजर कोड १९०८ चे ऑर्डर २६ रुल ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर नेमणुकीसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादीनुसार, सदरील वादी यांनी प्रतिवादी विरुद्ध ताकिदीसाठी व म्यांडेटरि इंजन्क्षण साठी दावा केलेला आहे. सदरील दाव्याच्याकामी नि. ५ च्या अर्जावर वाई येथील न्यायालयात किरकोळ अपील क्र. १९९/२०२३ किरकोळ अपील प्रलंबित आहे. दाव्याचे कामकाज सुरु असताना प्रतिवादी याने वादी यांच्या गट नंबर १० या दावा मिळकतीमध्ये पश्चिम बाजूने कंपाउंड भिंतीचे काम सुरु केले व वादी यांच्या गट नं. १० या मिळकतीमध्ये पश्चिम बाजूने सुमारे ५ फुट इतके घुसून अतिक्रमण करुन खोदकाम व बांधकाम दांडगाव्याने सुरु केले. वादी यांनी हरकत घेतली असता प्रतिवादी यांनी हरकतीला जुमानले नाही व रेटून दांडगाव्याने वादीच्या जागेत बेकायदेशीर अतिक्रमण करुन कंपाउंड भिंतीचे बांधकाम केलेले आहे. याबाबत वादी यांनी दिनांक ०४/०८/२०२३ रोजी शिरवळ पो. स्टे. येथे रजिस्टर पोस्टाने तक्रार देऊनही पोलीसांनी अद्याप कोणतीही कारवाई केली नाही.

०३. वादीनुसार, वरीलप्रमाणे दावा सुरु असताना प्रतिवादीने गट नं. १० यामध्ये कंपाउंड भिंतीचे अतिक्रमण करुन बांधकाम केले असल्याने मा. तालुका

अधीक्षक भूमि अभिलेख खंडाळा यांचेमार्फत दावा मिळकत गट नं. १० या मिळकतीची मोजणी होऊन पश्चिम बाजूने प्रतिवादी याने किती क्षेत्रात अतिक्रमण केले आहे याची संपूर्ण माहिती मे. कोर्टात उपलब्ध होणार आहे. त्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. सबब, वादीने मौजे शिरवळ येथील दावा मिळकत गट नं. १० या मिळकतीची मा. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेमार्फत मोजणी होऊन त्याचा अहवाल नाकाशासहित मे. कोर्टामध्ये सादर करणेबाबतचा आदेश मा. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना देण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

०४. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादीने निशाणी क्र. ४० वर असे म्हणणे दाखल केले की, वादी यांनी नि. ३८ ला दिलेला अर्ज खोटा व लबाडीचा आहे. वादी यांचे निशाणी ३८ चे अर्ज कलम २ व ३ मधील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून तो या प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. वादी यांचे निशाणी ३८ मधील मागणी व विनंती खरी व प्रामाणिकपणाची नाही. वादीस अशा प्रकारे अर्ज दाखल करुन कोर्टाची मदत घेवून शासकीय यंत्रणेचा वापर करुन पुरावा गोळा करता येणार नाही व पुरावा गोळा करुन मिळणेसाठी अर्ज दाखल करता येणार नाही. वादीचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी व अतिक्रमण काढून मिळणेसाठी असलेने वादीने त्याचे केस स्वतंत्ररित्या स्वतःच्या पुराव्यावर शाबीत करणे जरुरीचे आहे. वादीस स्वतःची केस शाबीत करणेसाठी मे. कोर्टाची मदत घेता येणार नाही व मे कोर्टाची मदत घेवून पुरावा गोळा करता येणार नाही, तयार करता येणार नाही व त्यासाठी मोजणीही मागवता येणार नाही. त्यामुळे वादीचा निशाणी ३८ चा अर्ज कायदेशीर नाही. वादीने तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेमार्फत दिनांक २३/०८/२०२२ रोजी मे. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख खंडाळा यांचेमार्फत मो. र. नं. ७०/२०२२ ने मोजणी झालेली आहे. सदर मोजणीमध्येही कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण दाखविलेले नाही.

०५. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, सदर कामामध्ये वादी यांचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज मे. कोर्टाने फेटाळलेला आहे. त्यामधील निष्कर्ष विचारात घेताही वादी यांना अशा प्रकारे अर्ज दाखल करुन मोजणी करुन मागता येणार नाही. वादी याने यापूर्वीही २०१४ मध्ये मो.र.क्र. १५७२ ने मोजणी मागवली होती. वादीचा दि. २६/०४/२०१४ चा अर्ज पाहता त्यावेळीही मोजणी झालेचे दिसून येते. तसेच वादी हा वेगवेगळया प्रकारे मोजण्या मागावून पुरावा निर्माण करणेचा प्रयत्न करत आहे. प्रतिवादी व प्रतिवादीचे पूर्वहक्कदार यांना मो.र.नं. १/८३ ने प्रतिवादीचे सि. स. नं. १११५ ची मोजणी दिनांक ०५/०९/१९९९ रोजी करुन घेतलेली आहे व त्यामध्येही प्रतिवादीचे मिळकतीच्या हद्दी मोजणीदार यांनी कायम स्वरुपीच्या दाखविलेल्या आहेत. तसेच १६/१०/२०१५ रोजी ही प्रतिवादी याने सि.स.नं. १११५ ची मोजणी करुन हद्दी कायम करुन त्यानंतरच बांधकाम पूर्ण केलेले आहे, त्यामुळे प्रतिवादी याचे मालकीचे सि.स.नं. १११५ शी वादी यांचा कोणताही कसलाही संबंध नाही. प्रतिवादी यांनी वादीचे हद्दीमूध्ये कधीही केव्हाही कसलेही कोणतेही अतिक्रमण केलेले नव्हते व नाही. त्यामुळे त्यानंतर झालेल्या मोजण्या मध्येही वादीने मोजणी मागवून हि कोणतेही अतिक्रमण झालेचे नसल्याचे दिसून आलेले आहे त्यामुळे सदर कामी पुन्हा मोजणी मागवणेची आवश्यकता राहिलेली नाही. वादीने स्वतःची केस स्वतःच्या पुराव्यावर शाबीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी वादीस मे. कोर्टाची मदत घेता येणार नाही. वादीचा मोजणी मागवीणेचा हेतु स्वच्छ व प्रमाणिक नाही. वादीस पुरावा निर्माण करणेसाठी व पुरावा तयार करणेसाठी मे. कोर्टाची मदत घेवून शासकीय यंत्रणेचा वापर करुन पुरावा गोळा करुन वादीस त्याची केस शाबीत करणेसाठी अशाप्रकारे मोजणी मागविता येणार नाही. अर्ज दाखल करणेस केव्हा, कोठे, कोणत्या तारखेस कारण घडले याचा कोठेही उल्लेख नाही, सबब वादीचा निशाणी ३८ चा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

०६. अर्जाचे व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे याचे अवलोकन करण्यात आले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यामुळे सदरचा अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांच्या अर्जानुसार कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करण्याची आवश्यकता आहे काय ? | **नाही.** |
| २. | आदेश काय? | अर्ज **नामंजूर** करण्यात आला. |

**<u>कारणमिमांसा</u>**

०७. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. सदरचा दावा हा अचल संपत्तीबाबत निरंतर मनाई हुकूम तसेच अतिक्रमणाबाबतचा आहे. सदरच्या दाव्यात तुर्तातुर्त ताकीद हा वादींचा प्रतिवादींविरुद्ध नाकारण्यात आलेला आहे. त्या ताकीद अर्जात प्रतिवादीने बेकायदेशीर बांधकाम केले आहे, याबाबत ताकीद मागण्यात आली होती. प्रस्तुतच्या अर्जात वादीने दावा मिळकतीची मा. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेमार्फत मोजणी होवून त्याचा अहवाल नकाशासहित मे. कोर्टामध्ये सादर करणेबाबतचा आदेश मा. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांना देण्यात यावा अशी मागणी केली आहे. परंतु अर्जात नमूद प्रमाणे बांधकाम कधी केले याबाबत काही उल्लेख नाही. मुळातच तुर्तातुर्त मनाई हुकूमाबाबत जी प्रार्थना वादीने मागितली होती त्याच प्रार्थनांच्या आधारे सदरचा अर्ज दाखल केल्याचे दिसते. जरी प्रथमदर्शनी प्रतिवादींनी बांधकामाची परवागनी घेऊन सदरचे बांधकाम केले आहे असे दिसते तरी पुन्हा त्या बांधकामाबाबत पुन्हा अहवाल मागवण्याची आता गरज नाही.

०८. सदरचा अहवाल मागवून वादी हे दाव्याचे कामी पुरावा गोळा करु शकणार नाही. मुळातच आता अहवाल मागविण्याची आवश्यकता नाही. उपरोक्त नमूद सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्रमांक १ चे उत्तर **नकारार्थी** देण्यात येते व मुद्दा क्रमांक २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादीचा सदरचा अर्ज निशाणी ३८ नामंजूर करण्यात येतो. |
| २. | खर्चाबाबत आदेश नाही. |

PATTEBAHADUR KARUNA
Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.04.05 11:02:35 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)
दिनांक – ०२.०४.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा
लघुलेखकाचे नाव – सौ. एस.एस.शिंदे

Sd/-
(एस. एस. शिंदे)
लघुलेखक